# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** सालेकसा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0006 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/01/2026 06:10

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 05/01/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/01/2026
**Time From (वेळेपासून):** 13:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/01/2026 **Time (वेळ):** 05:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/01/2026 05:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सालेकसा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उमाकांत गोवर्धन उगले

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** गोवर्धन

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदि,गोदिया ,सालेकसा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,गोदिया,सालेकसा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9664959090

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजया जागेष्वर चुटे | | | 1. शिवाजी नगर बनगांव,आमगाव , सालेकसा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | देवराज अनंतराम चिंधालोरे | | | 1. साखरीटोला ,सालेकसा , सालेकसा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | मोबाईल फोन | 01 vivo कंपनीचा जु.वा | 5,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | मोबाईल | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | 01 samsung कंपनीचा जु.वा मोबाईल | 1,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | टेप रेकॉर्डर | 02 32 gb छमतेचे सेनेडिक्स कंपनीचे मेमरी कार्ड | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतील चलनातील 500 रु दराचा 06 चलनी नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

9,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांकः- 05.01.2026

नांवः- उमाकांत गोवर्धन उगले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. 9664959090.

आज रोजी मी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, दिनांक 04.01.2026 रोजी मुख्यालयी हजर असतांना संध्याकाळी 05.45 वा. सुमारास आमचे मोबाईल क्र.9664959090 वर मोबाईल क्र.7745869918 वरुन का ॅल आल्याने का ॅल रिसीव्ह केला असता का ॅल करणारे इसमाने त्यांचे नाव श्री. अषोक मनोहर वरगंटवार रा. रिसामा/आमगाव असे सांगुन ते श्री. विद्या गर्ल्स हायस्कुल सातगाव (साखरीटोला) येथे परिचर या पदावर नोकरीस असुन त्यांचे आष्वासीत प्रगती योजनेचे लाभाचे फरकाचे बिल काढुन देण्याकरीता मुख्याध्यापिका श्रीमती चुटे मॅडम हया लाच मागत असल्याने त्यांचे विरुध्द तक्रार द्यावयाची आहे असे सांगीतल्याने आम्ही त्यांना तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे येण्यास सांगीतले. त्यावर त्यांनी ते सध्या आमगाव येथे असुन आता तक्रार द्यावयास येवु शकत नाही. परंतु उद्या दिनांक 05.01.2026 रोजी 10.00 पासुन शाळा असल्याने सकाळी 07.30 वा. ते 08.00 वा. पर्यंत तक्रार देण्यास कार्यालयात येतो असे सांगीतल्याने त्यांना ठिक आहे उद्या या असे सांगीतले. तक्रारदार यांनी फोनवर सांगीतलेल्या तक्रारीनुसार पुढील कार्यवाही करणे असल्याने अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 05.01.2026 रोजी सकाळी 07.30 वा. कार्यालयात हजर राहण्यास सांगीतले.

आम्ही दिनांक 05.01.2026 रोजी कार्यालयात हजर असतांना 08.00 वाजता सुमारास एक ईसम कार्यालयात हजर आले व त्यांनी त्यांचे नाव श्री. अषोक मनोहर वरगंटवार रा. रिसामा/आमगाव असे सांगुण दिनांक 04.01.2026 रोजी संध्याकाळी मीच फोन केला होता असे सांगीतले. त्यावरुन त्यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा करुन त्यांची तक्रार लिहुन देण्यास सांगीतले असता त्यांनी त्यांचे हस्ताक्षरात लेखी तक्रार लिहुन दिली. त्यासोबत कागदपत्रे तसेच लाचेमध्ये देण्याकरीता रु.3000/- लाच रक्कम जमा केली व 10.00 वा. पासुन शाळा असल्याने शाळेत जावयाचे आहे असे सांगीतल्याने आम्ही त्यांना आमचेकडुन करण्यात येणा-या कार्यवाहीबाबतची थोडक्यात माहिती सांगुन सापळा पथक व शासकीय पंच घेवुन सातगाव साकरीटोला येथे पोहचुन आपणास फोन केल्यावर सांगीतलेल्या ठिकाणी हजर यावे असे सांगुण त्यांना शाळेत जाण्यास रवाना केले.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी शासकीय कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करून देण्याकरीता जिल्हा महिला बाल विकास अधिकारी गोंदिया यांना कार्यालयाचे पत्र क्रमांक 26/2026 दि. 05.01.2026 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक. 14/2026 दि. 05.01.2026 अन्वये े श्रीमती रेखा केषरीचंद बघेले, पद-

संरक्षण अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय गोंदिया व सहायक कामगार आयुक्त कार्यालय गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक 27/2026 दि. 05.01.2026 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक 06/2026 दि. 05.01.2026 अन्वये े श्री अजित यषवंत राउत, पद-कनिष्ठ लिपिक, सहायक कामगार आयुक्त कार्यालय गोंदिया असे उपलब्ध करुन दिले.

नमुद दोन्ही पंच वेळ 11.30 वा. लाचलुपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर आल्यावर त्यांचेषी परिचय करुन घेवुन सापळा पार्टीतील सदस्य पो.नि.अरविंद राउत, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजयकुमार बोहरे, पो. हवा. मंगेष काहालकर, नापोषि. संतोष शेंडे, संतोष बोपचे, प्रषांत सोनवाने, मनापोशि संगीता पटले, मनापोशि रोहीणी डांगे, चानापोशि दिपक बाटबर्वे सर्व ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया यांचा नमुद दोन्ही पंचांषी परिचय करून दिला व तक्रारदार श्री. अषोक मनोहर वरगंटवार असे असुन त्यांनी तक्रार नोंदुवन तसेच गै.अ.यांना लाचेमध्ये देण्यासाठी लाच रक्कम रु.3000/- जमा करुन ते आपले सातगाव साकरीटोला येथील शाळेत गेले असल्याने आपण सर्व सापळा कारवाईसाठी तिथे गेल्यावर हजर मिळतील असे सांगुन त्यांची एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे सांगीतले. त्यांनतर आम्ही सापळा पथक व दोन्ही पंचासह साकरीपाठ मंदीर परिसरात जावुन तक्रारदार यांना भेटुन तक्रारदार यांनी नोंदविलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन त्यावर सहया केल्या त्यानंतर आम्ही त्या तक्रारीवर स्वाक्षरी केली. तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.

दिनांक - 05.01.2026

प्रती,

मा. पोलीस उपअधिक्षक साहेब,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया

विषय:-सेवाअंतर्गत आष्वासीत प्रगती योजनेच्या लाभाच्या फरकाची थकीत वेतन मिळवुन देण्यासाठी मला लाच मागणाÚया मुख्याध्यापिका श्रीमती अजया चुटे यांच्यावर कायदेषीर कार्यवाही करणे बाबत.

अर्जदार:- श्री. अषोक मनोहर वरगंटवार, वय 53 वर्ष, व्यवसाय परीचर, श्री. विद्या गल्र्स हायस्कुल सातगाव (साखरीटोला), ता. सालेकसा, जि. गोंदिया, रा. सिव्हील लाईन, रिसामा, आमगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया, मो. क्र. 7745869918.

महोदय,

सविनय सादर की, मी वर नमुद प्रमाणे असुन आमगाव येथे माझे परीवारासोबत राहत असुन मी श्री. विद्या गल्र्स हायस्कुल सातगाव (साखरीटोला), ता. सालेकसा, जि. गोंदिया येथे दिनांक 01.06.1997 पासुन परीचर म्हणुन कार्यरत आहे. सदर संस्था 100 टक्के अनुदानित आहे.

मला दिनांक 01.01.2024 पासुन सेवाअंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यास मा. षिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परीषद गोंदिया यांचे कार्यालयातुन मंजुरी मिळालेली असुन मला सदर योजनेचा प्रत्यक्ष लाभ मे 2025 पासुन प्रती महिना 1630 रूपयाची वाढ माझे पगारात मिळत आहे. 1 जानेवारी 2024 ते एप्रिल 2025 पावेतो 16 महिण्याची सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचा लाभाच्या फरकाची थकीत बिल मिळण्यासाठी मी दिनांक 09.12.2025 रोजी मा. मुख्याध्यापिका श्रीमती अजया चुटे, श्री. विद्या गल्र्स हायस्कुल सातगाव (साखरीटोला), ता. सालेकसा, जि. गोंदिया यानां अर्ज दिला असता त्यांनी सदर अर्ज माझ्या सोबतचे दुसरे परीचर देवराज अनंतराम चिंदालोरे यांच्या मार्फतीने परत दिला.

दिनांक 22.12.2025 रोजी श्रीमती अजया चुटे मॅडम यांनी मला तसेच माझ्या बरोबरील सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचे लाभार्थी देवराज चिंदालोरे यानां त्यांचे कार्यालयात बोलावुन सांगीतले की, तुमचे बिलाचे काम तुम्हीच करा, बील तयार करून त्यावर मी सहया करते, तुम्हाला पासवर्ड देते, तुम्ही आॅनलाईन सबमीट करा असे सांगीतले. तेव्हा मी त्यानां मला आॅनलाईनचे काम जमत नाही तुम्हीच करून द्या असे सांगीतले. तेव्हा मॅडमनी मला वेळ नाही असे सांगीतले. त्यानंतर मी त्याबाबत माझ्या ओळखीचे मित्र यानां सांगितले असता त्यांनी मी बील बनवुन आॅनलाईन सबमिट करून देतो असे सांगीतल्याने दिनांक 24.12.2025 रोजी मी, मा. मुख्याध्यापिका श्रीमती अजया चुटे यानां माझी सेवापुस्तीका सदर योजनेचा आदेष व पासवर्ड मिळणे बाबत अर्ज दिला असता त्यांनी ते देण्यास नकार दिला.

दिनांक 29.12.2025 रोजी श्रीमती अजया चुटे मॅडम यांनी मला तसेच माझ्या बरोबरील सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचे लाभार्थी देवराज चिंदालोरे यानां त्यांचे कार्यालयात बोलावुन सांगीतले की, सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचे लाभाचे फरकाचे बिल काढुन देण्यासाठी तुम्हाला प्रत्येकी 5000 रूपये द्यावे लागतील. तेव्हा मी मॅडमला माझ्याकडे पैसे नसल्याबाबत सांगीतले असता त्यांनी दिनांक 31.12.2025 रोजी साईड बंद

होणार आहे, तुमचे बिल पुढच्या वर्शी निघेल असे सांगीतले. तेव्हा मी नाईलाजाने मॅडमला म्हणलो की, मी 5000 रूपये देवु षकत नाही. 2000 रूपये देतो असे सांगीतले. तेव्हा मॅडमनी तुमचे बिल मिळणार नाही असे सांगीतले.

दिनांक 31.12.2025 रोजी दुपारी 03.15 वाजताचे सुमारास श्रीमती अजया चुटे मॅडम यांनी मला परीचर देवराज चिंदालोरे यांचे मार्फतीने त्यांचे कार्यालयात बोलावुन सांगीतले की, ठिक आहे तुम्ही मला सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचे लाभाचे फरकाचे बिल काढुन देण्यासाठी, आता 2000 रूपये द्या व पगार झाल्यावर 3000 रूपये द्या असे म्हणाले. तेव्हा मी नाईलाजाने माझे खिष्यातुन 2000 रूपये काढुन मॅडमला दिले असता त्यांनी परीचर देवराज चिंदालोरे यांचेकडे देण्यास सांगीतले. त्यानंतर मी 2000 रूपये देवराज चिंदालोरे यांचेकडे दिले. षाळा सुटल्यानंतर षाळेतुन जातांना मॅडम म्हणाल्या की, पगार झाल्यावर 3000 रूपये आणुन द्या. त्यानंतर दिनांक 01.01.2026 रोजी मॅडम षाळेत आल्या नंतर म्हणाले की, साईड बंद झाली आहे आता पुढच्या वर्षी तुमचे बिल निघेल.दिनांक 02.01.2026 रोजी मला माहीती मिळाली की, थकीत वेतन आॅनलाईन करण्यासाठीची साईडची मुदत दिनांक 10.01.2026 पावेतो वाढ झाली आहे. त्या बाबत मी मुख्याध्यापिका मॅडमला सांगीतले असता त्यांनी उर्वरीत 3000 रूपये आणुन द्या असे म्हणाले. दिनांक 02.01.2026 रोजी पगार झाल्याबाबतचा मैसेज माझ्या मोबाईलवर सायंकाळी आला आहे. दिनांक 05.01.2026 रोजी मला मुख्याध्यापिका श्रीमती अजया चुटे मॅडम सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचे लाभाचे फरकाचे बिल काढुन देण्यासाठीचे उर्वरीत 3000 रूपये मागतील.

सेवा अंतर्गत आष्वासित प्रगती योजनेचे लाभाचे फरकाचे बिल काढुन देण्यासाठी मला 5000 रूपयाची मागणी करून माझ्याकडुन घेतलेले 2000 रूपये व उर्वरीत 3000 रूपये ही लाच रक्कम असुन ती श्रीमती अजया चुटे, मुख्याध्यापिका यानां देण्याची मुळीच ईच्छा नाही. तरी श्रीमती अजया चुटे, मुख्याध्यापिका, श्री. विद्या गर्ल्स हायस्कुल सातगाव (साखरीटोला), ता. सालेकसा, जि. गोंदिया यांचेवर कायदेषीर कार्यवाही करण्याची विनंती आहे.

श्रीमती अजया चुटे, मुख्याध्यापिका यांचे बरोबर माझे आर्थिक देवाण-घेवाण नाही. तसेच भांडण- तंटा किंवा वैर भाव नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या रू. 500/- दराचे 06 चलनी नोटा असे एकुण रू. 3,000/- जमा केले होते त्या नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिल्यानंतर रू. 500/- दराचे 06 भारतीय चलनी नोटांची वेगळी यादी तयार करण्यात आली.

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो. हवा मंगेश काहालकर यांनी सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटाॅप, प्रिंटर जोडणी उपकरणासह असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्ल्यु 0486 मध्ये ठेवले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह शासकीय तसेच खाजगी चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गांेदिया येथुन सातगाव साकरीटोला येथे जाण्याकरीता 12.00 वा. रवाना होवुन 13.00 वा. सुमारास साकरीटोला षिवारातील साकरीपाठ मंदीराजवळ पोहचल्यावर तक्रारदार यांना फोन करुन तिथे येण्यास सांगीतले. आम्ही सापळा पथक व पंचासह हजर असतांना तक्रारदार हे 13.20 वा.हजर आले. सर्वांनी आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अषाप्रकारे नजरेआड आडोषाला ठेवुन त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही विषयी सर्वांना समजावुन सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांचा पंच व सापळा पथकाषी परिचय करुन दिल्यानंतर दोन्ही पंच यांना तक्रारदार यांनी नोंदविलेली तक्रारीसंबंधाने विचारपुस करण्यास सांगीतले त्यावरुन दोन्ही पंचानी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबंधाने तोंडी विचारपुस करुन तक्रारदार यांनी नोंदविलेली तक्रारीतील मजकुर सारखाच असल्याची खात्री केली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाÚया अॅंथ्राॅसीन पावडर, अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैषिष्टे समजावून सांगुण अधिनस्त कर्मचारी यांचे हस्ते प्रात्याक्षीक करुन दाखविले. त्यानंतर तक्रारदाराने लाच म्हणून द्यावयासाठी जमा केलेल्या रू. 500/- दराचे 06 चलनी नोटांना आमचे सुचनेवरून अधिनस्त अमलदार यांनी त्या नोटांना दोन्ही बाजुने अॅंथ्राॅसीन पावडर लावुन अॅंथ्राॅसीन पावडर लावलेल्या चलनी नोटा असे एकुण रू. 3000/-एका कागदी लिफाफ्यात टाकुन त्या लिफाफ्यावर पंच व आमचे सहीचे कागदी लेबल लावुन पंचासमक्ष सिलबंद करुन तो लिफाफा ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रारी नुसार गै.अ. श्रीमती अजया चुटे,मुख्याध्यापीका विद्या गर्ल्स हायस्कुल सातगाव साकरीटोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन अधिनस्त अमलदार यांनी तक्रारदार तसेच दोन्ही पंचांना कार्यालयीन "सोनी" कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तसेच सॅनडिस्क कंपनीचे नविन मेमरी कार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर मध्ये नविन सेल टाकुन व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस रेकॉर्ड फाईल नसल्याची पंच व तक्रारदार याना खात्री करुन दिली. त्यानंतर प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4427DRJGH15D असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डीग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व आम्ही खात्री केली. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कषा पध्दतीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कषा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फॉर्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्ड फाईल नसल्याची खात्री केली.

तक्रारदार यांनी गै.अ.श्रीमती चुटे मॅडम हया शाळेमध्ये हजर असुन त्यांना ग्रामपंचायत साकरीटोला येथे शाळेच्या टॅक्स संबंधाने जावुन येतो असे सांगुन आलो आहे असे दोन्ही पंचासमक्ष सांगीतल्याने गै.अ.यांचे विरुध्दची लाच माणगी पडताळणी कार्यवाही आजच श्री विद्या गर्ल्स हायस्कुल सातगाव साकरीटोला येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणाÚया दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन अधिनस्त अमलदार यांनी सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकार्डर वेळ 13.40 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले व त्यांना पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन त्यांचे मोटार सायकलने गै.अ. यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता श्री विद्या गर्ल्स हायस्कुल सातगाव साकरीटोला येथे पाठविले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याठिकाणी थांबुन राहीलो.

तक्रारदार हे गै.अ.यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेवरुन आमचे अधिनस्त अंमलदार यांनी तक्रारदार यांचे गळयात असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 15.22 वाजता बंद केले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260105_1340.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेली हकीकत कथन करण्यास सांगीतले असता त्यांनी हकिकत कथन केल्यानंतर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260105_1340.mp3 मध्ये तक्रारदार व गै. अ. यांच्यातील रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत व त्यास तक्रारदार यांनी दिलेल्या दुजोÚयावरुन तसेच तक्रारदार व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे काम करुन देण्यासाठी यापुर्वी रुपये 2000/- घेतले व उर्वरीत रुपये 3,000/- रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. असल्याने सापळा कार्यवाही त्यांचे कार्यालयात जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले. पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी रु.2000/- मिळाल्याचे मान्य करुन उर्वरीत रु.3,000/- लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 06 चलनी नोटा असे एकुण रू.3,000/- चा लाच रक्कमेचा लिफाफा आमचे सुचनेवरुन आमचे अधिनस्त अंमलदार यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचेकडे दिला. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र.1 यांनी त्या लिफाफ्यातील रु.500/- दराचे 06 चलनी नोट असे एकुण रु.3000/-

लाच रक्कम काढुन तक्रारदार यांचे फुलपँटचे समोरील उजवे खिषात ठेवुन दिली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाÚया दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन आमचे अधिनस्त अंमलदार यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मधुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले मेमंरी कार्ड बाहेर काढुन त्यांचे मुळ आवरणाममध्ये ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिले. त्यानंतर प्लाॅस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5172XV3018QL असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री केल्यानंतर वेळ 15.58 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाॅईस रेकाॅर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे खाजगी मोटारसायकलने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता श्री विद्या गल्र्स हायस्कुल सातगांव साकरीटोला येथे रवाना करण्यात आले.

त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2, व उर्वरीत सापळा पथक शासकीय तसेच खाजगी चारचाकी वाहनाने श्री विद्या गल्र्स हायस्कुल सातगांव साकरीटोला येथे रवाना झालो. आम्ही सर्व श्री विद्या गल्र्स हायस्कुल सातगांव साकरीटोला जवळ पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संषय येणार नाही अषा स्थितीत उभे करुन व तिथेच थांबुन तक्रारदार यांचे नियोजीत ईषाÚयाची वाट पाहत बसलो.

त्यादरम्यान वेळ 16.00 वा. चे सुमारास तक्रारदार यांनी श्री विद्या गल्र्स हायस्कुल सातगांव साकरीटोलाचे पटांगणात येवुन आपले डोळयावरील चष्मा काढुन रुमालने पुसुन हातात ठेवुन गै.अ. यांनी त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित ईषारा केला. तक्रारदाराने केलेला नियोजित ईषारा पाहुन आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य पंच क्र. 2 यांचेसह तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे जवळ पोहचलो. आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कुठे ठेवली याबाबत ईषाराने विचारले असता त्यांनी मुख्याध्यापक यांचे सांगणेवरुन चिंधालोरे यांचेकडे दिली असता चिंधालोरे यांनी मुख्याध्यापक चुटे मॅडम यांचे समोर टेबलवर ठेवली तेव्हा मुख्याध्यापक चुटे मॅडम यांनी त्या नोटां झाकण्यासाठी कागद ठेवला असल्याचे सांगीतले. त्यावर त्यांना त्या ठिकाणाहुन थोडया अंतरावर जावुन थांबण्यास सांगितले.
त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम कोणी स्विकारली व ती त्यांनी कोठे ठेवली आहे? असे विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, गै.अ. चुटे मॅडम यांनी सांगीतल्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे फुलपँटचे उजवे खिषात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 3,000/- उजव्या हाताने काढुन मुख्याध्यापक यांचे सांगणेवरुन त्यांचे कक्षात हजर असलेले चिंधालोरे यांचेकडे देवुन गै.अ. मुख्याध्यापक चुटे मॅडम यांना त्या दिवषीचे रु. 2,000/- व आजचे रु. 3,000/- असे रु. 5,000/- दिले ठिक आहे असे म्हणुन चिंधालोरे भाऊ असे म्हटल्यावर चिंधालोरे यांनी ती लाच रक्कम आपले हाताने स्विकारुन गै.अ. मुख्याध्यापीका चुटे मॅडम यांचे समोर टेबलवर ठेवली असता मुख्याध्यापीका चुटे मॅडम यांनी त्या नोंटावर कागद झाकुन ठेवला असे सांगीतले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना जवळ बोलावुन आमच्या सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हाॅईस रेकाॅर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकाॅर्डर 16.08 वाजता बंद केले. व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260105_1558.mp3 रेकाॅर्ड झाल्याचे दिसुन आले.
आमच्या सुचनेवरुन लाच रक्कम स्विकारलेल्या इसमाजवळ जावुन पो.हवा.मंगेष काहालकर यांनी डावा हात व ना. पो.षि.संतोष बोपचे यांनी त्याचा उजवा हात कोपरापासुन घट्ट पकडला. आम्ही त्यांना तसेच गै.अ.मुख्याध्यापिका यांना आमचा, दोन्ही पंचांचा व सापळा पार्टीतील सर्व सदस्यांचा परिचय देवुन त्यांना कार्यवाही कामी सहकार्य करण्याबाबत सुचना दिल्या. त्यावर ते त्याच ठिकाणी शांतपणे बसुन राहीले. आम्ही लाच रक्कम स्विकारणाÚया इसमास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्री देवराज अनंतराम चिंधालोरे वय 58 वर्ष, पद-परिचर श्री विद्या गल्र्स हाॅयस्कुल सातगांव साकरीटोला, मुळ पत्ता- साकरीटोला वार्ड क्र. 2, ता.सालेकसा जि.गोंदिया असे सांगीतले. तसेच गै.अ.मख्याध्यापिका यांनी त्यांचे नांव श्रीमती अजया जागेष्वर चुटे वय 43 वर्ष, मुख्याध्यापिका, श्री विद्या गल्र्स हाॅयस्कुल सातगांव साकरीटोला, मुळ पत्ता-वार्ड क्र. 1 षिवाजी नगर बनगांव ता.

आमगांव, जि. गोंदिया असे सांगीतले.
त्यानंतर आमचे सुचनेवरून अधिनस्त अंमलदार यांनी शासकीय वाहनात ठेवलेली ट्रॅप सुटकेस व साहीत्य आणले. त्यानंतर आम्ही त्यांना आम्हा सर्वांचे हात अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाषात तपासण्यास सांगितले त्यावरुन त्यांनी काळ्या कापडाच्या सहाय्याने प्रकाषाची तीव्रता कमी करुन अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाषात आमचे, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांचे हात तपासले असता कोणाचेही हातास कोणत्याच प्रकारची चकाकी दिसून येत नसल्याची गै.अ.यांना खात्री करुन दिली. त्यानंतर काळा कापड हटवुन प्रकाष पुर्ववत करण्यात आला.
त्यानंतर काळ्या कापडाच्या सहाय्याने प्रकाषाची तिव्रता कमी करुन गै.अ. देवराज अनंतराम चिंधालोरे यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हा‍ॅयलेट लॅम्पचे प्रकाषात तपासले असता त्यांचे उजव्या  हाताचे बोटांवर, अ‍ँथ्रा‍ॅसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर काळा कपडा हटवुन प्रकाष पुर्ववत करण्यात आला.
आरोपी देवराज अनंतराम चिंधालोरे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन आरोपी मुख्याध्यापिका चुटे मॅडम यांचे टेबलवर ठेवले असल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी सदर लाच रक्कम रु.500 दराचे 06 चलनी नोटा असे एकुण रू. 3,000/- टेबलवरुन आपल्या हातात ठेवल्या. आम्ही त्यांना गै.अ.यांचे कार्यालयातील टेबलावर एक कोरा कागद आंथरून त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवण्यास सांगितले. त्यानुसार पंच क्र. 1 यांनी त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवल्या.
त्यानंतर आमचे सुचने वरुन अधिनस्त अंमलदार यांनी काळ्या कपडयाच्या सहाय्याने प्रकाषाची तिव्रता कमी करून लाच रकमेच्या नोटांना अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाषात तपासले असता सदर नोटांना दोन्ही बाजुने अ‍ॅथ्रा‍ॅसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने सदर रक्कम ही लाचेची रक्कम असल्याची आमची व पंचाची खात्री झाली. त्यानंतर प्रकाष पुर्ववत करुन लाचेच्या नोटांचे क्रमांक पंच क्रमांक 2 यांना वाचण्यास सांगितले असता पंच क्र. 1 यांनी ते तक्रारदार यांनी लाच रक्कम जमा करतेवेळी तयार केलेल्या लाच रकमेच्या नोटांच्या यादीतील क्रमांकाषी जुळवुन पाहीले असता सापळा कार्यवाही करीता जातांना रु.500/- दराचे 06 चलनी नोटांचे क्रमांक व आरोपी लोकसेविका यांचे टेबलवर मिळुन आलेल्या नोटांचे क्रमांकाषी तंतोतंत जुळुन आले. त्या नोटा एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे‍ वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी मुख्याध्यापिका श्रीमती चुटे मॅडम यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद केला. तसेच त्यांचेकडे असलेला VIVO कंपनीचा V23 Pro मोबाईल एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे‍ वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी मुख्याध्यापिका श्रीमती चुटे मॅडम यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद करुन तपासकामी जप्तीपत्रक क्र. 1 अन्वये जप्त करण्यात आला. तसेच आरोपी देवराज अनंतराम चिंधालोरे यांचा त्यांचेकडे असलेला SAMSUNG  DUOS कि पॅड मोबाईल एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे‍ वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी देवराज अनंतराम चिंधालोरे यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद केला व तपासकामी जप्तीपत्रक क्र. 2 अन्वये जप्त करण्यात आला. त्यानंतर आमचे सुचनेवरून पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.
त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना ते तक्रारदारासह साकरीपाठ मंदीर शिवार परीसरातुन निघुन श्री विद्या गर्ल्स हायस्कुल सातगांव साकरीटोला येथे पोहचुन नियोजित इषारा करेपर्यत घडलेल्या घटना व झालेले संभाषण याबाबत सविस्तर माहिती सर्वासमक्ष पंच क्र. 2 यांना सांगण्याबाबत निर्देष दिले. त्यावरून पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत पुढील प्रमाणे आहे.
”मी तक्रारदार यांचेसोबत त्यांचे मोटारसायकलने साकरीपाठ मंदिर शिवार परीसरातुन निघुन श्री विद्या गर्ल्स हायस्कुल सातगांव साकरीटोला येथे गेलो असता गै.अ. मुख्याध्यापिका चुटे व त्यांचे समोर चिंधालोरे उभा होता. तक्रारदार यांनी गै.अ. चुटे मॅडम यांना त्या दिवषी रु.2000/- दिले असे म्हणुन आपले फुलपॅंटचे उजवे खिषात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 3000/- उजव्या हाताने काढुन हे तिन हजार रुपये असे म्हटल्यावर गै.अ. चुटे मॅडम यांनी तक्रारदार यांना चिंधालोरे भाऊषी बोला असे म्हटले, त्यावर तक्रारदार यांनी रुपये 3,000/- चिंधालोरे यांचेकडे देवुन झाले मॅडम  त्या दिवषीचे दोन हजार आणि आजचे तिन हजार पाच हजार दिले मी ठिक आहे असे म्हणुन चिंधालोरेकडे जावुन चिंधालोरे भाऊ असे म्हटल्यावर गै.अ. चिंधालोरे यांनी ती लाच रक्कम आपले उजव्या हाताने स्विकारुन गै.अ. मुख्याध्यापिका चुटे मॅडम यांचे समोर टेबलवर ठेवली असता मुख्याध्यापक चुटे मॅडम यांनी त्यां नोंटावर कागद झाकुन ठेवला. त्यानंतर तक्रारदार यांचेसह त्यांचे मुख्याध्यापक कक्षचे बाहेर पटांगणात येवुन तक्रारदार यांनी सापळा पथकास गै.अ. यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यानंतर आपण

पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली." अषी घटनेची हकीकत पंच क्र. 1 यांनी पंच क्र. 2 यांना सर्वासमक्ष सांगितली. यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामामध्ये घेण्यात आले आहेत.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

TIRUPATI ASHOK RANE(I (Inspector)) / 8975752465 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.** **(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** **(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court** **(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** TIRUPATI ASHOK RA
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** 8975752465

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र**.** ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)